आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -दुपारी ३.०० वाजता

१० नोव्हेंबर २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाचं संकल्पपत्र अमित शाह यांच्या उपस्थितीत प्रसिद्ध

- महाविकास आघाडीचा महाराष्ट्रनामा काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या उपस्थितीत जाहीर

- मतदान जनजागृतीसाठी विविध स्तरांवर कार्यक्रम

- ज्येष्ठ सारंगीवादक पंडित रामनारायण यांच्या पार्थिवावर काल मुंबईत शासकीय इतमामाने अंत्यसंस्कार

**आणि**

- फुलंब्री इथं दुकानाला लागलेल्या आगीत तीन जणांचा होरपळून मृत्यू, तर दोन जण जखमी

**<><><><><>**

भारतीय जनता पार्टीचा निवडणूक जाहीरनामा शेतकऱ्यांचा सन्मान, आणि गरीबांची सेवा करणारा, युवकांना रोजगाराच्या नव्या संधी देणारा आणि महिलांचं सक्षमीकरण करणारा असा असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत भाजपाचा निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध केल्यानंतर बोलत होते.

लाडकी बहीण योजनेअंतर्गत दिली जाणारी रक्कम दीड हजार रुपयांवरून एकवीसशे रुपये करणार, महिला सुरक्षेसाठी २५ हजार महिलांचा पोलिस दलात समावेश केला जाणार, शेतकऱ्यांना कर्जमाफी, २५ लाख रोजगारांची निर्मिती, अशी अनेक आश्वासनं या जाहीरनाम्यात दिली आहेत.

महाविकास आघाडीची अनेक आश्वासनं ही केवळ लोकानुनयासाठी असून ती प्रत्यक्षात उतरणारी नसल्याची टीकाही शाह यांनी केली. खोटं फार काळ टिकत नसल्यामुळेच २०२२ साली महाविकास आघाडीचं सरकार कोसळल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.

उपमुख्यमं ्री देवेंद्र फडणवीस, खासदार पियुष गोयल तसंच प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आज मुंबईत महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकीसाठीचा महाविकास आघाडीचा महाराष्ट्रनामा प्रकाशित केला. मुंबईत जाहीर केलेल्या पंचसूत्री कार्यक्रमावर आधारित हा सविस्तर जाहीरनामा प्रकाशित करत असल्याचं मल्लिकार्जुन खर्गे यावेळी म्हणाले. या महाराष्ट्रनाम्यात शेती आणि ग्रामीण विकास, उद्योग आणि रोजगार, पर्यावरणावर आधारित शहर विकास या मुद्द्यांवर आश्वासनं देण्यात आली आहेत. पंचसूत्री कार्यक्रमात प्रत्येक कुटुंबाला वर्षाकाठी ३ लाख रुपयांची मदत, महालक्ष्मी योजनेअंतर्गत पात्र महिलांना प्रतिमहिना ३ हजार रुपये, महिलांना मोफत बस सेवा, तीन लाखापर्यंत कृषीकर्ज माफी, बेरोजगारांना नोकरी शोधण्यासाठी दरमहा ४ हजार रुपये भत्ता, २५ लाखांचा आरोग्य विमा अशी आश्वासनं आहेत.

महाराष्ट्रासह देश आणि जगासाठी मुंबई हे एक अर्थ, रोजगार, निर्मिती, गुंतवणूक अशा सर्व घटकांच्या दृष्टीने महत्त्वाचं शहर आहे. मुंबईसह महाराष्ट्र हा सामाजिकदृष्ट्याही प्रगत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातली निवडणूक ही देशासाठी महत्त्वाची निवडणूक आहे. महाराष्ट्रात महाविकास आघाडीचं सरकार आल्यास इथे एक चांगलं प्रशासन येऊ शकेल. हा जाहीरनामा महाराष्ट्राचा अभ्यास करूनच प्रकाशित करत आहोत, असं खर्गे म्हणाले.

यावेळी खासदार सुप्रिया सुळे, खासदार संजय राऊत हेही उपस्थित होते.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी आजही ठिकठिकाणी प्रचारसभा होत आहेत. जुन्नर विधानसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार सत्यशील शेरकर यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांची प्रचारसभा आज झाली. धाराशिव जिल्ह्यातल्या भूम परंडा विधानसभा मतदारसंघातले मविआचे उमेदवार राहुल मोटे यांच्या प्रचारार्थ ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी सभा घेतली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची आज सोलापूर इथं सभा होणार आहे.

**<><><><><>**

मतदार जनजागृतीसाठी आज रत्नागिरी शहरात मॅरॅथॉन आयोजित केली होती. पोलीस मैदानातून सुरू झालेल्या या मॅरॅथॉनची सांगता भाट्ये समुद्रकिनाऱ्यावर झाली. विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी सर्व नागरिकांनी ब्रँड अँबेसेडर म्हणून काम करावं, असं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीसाठी तयार केलेल्या मतदार यादीला पुरवणी यादी जोडली आहे. त्यामुळे एकूण मतदार संख्येत ६ हजार ८७५ मतदारांची वाढ झाली आहे. त्यामुळे आता विधानसभा निवडणुकीसाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यात ६ लाख ७८ हजार ९२८ एकूण मतदार असून त्यात ४ हजार ७२ महिला मतदार तर २ हजार ८०१ पुरुष मतदार आणि दोन तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीत मतदारांनी मतदानाचं कर्तव्य करावं याकरता मतदान जनजागृतीचे कार्यक्रम महाराष्ट्रात सर्वत्र होत आहेत. निवडणूक आयोग आणि केंद्रीय संचार ब्यूरो तर्फे जनजागृती करणारी वाहनं राज्यातल्या १५ जिल्ह्यांमधे पाठवणयात आली आहेत. ठिकठिकाणी प्रशासकीय यंत्रणा आणि स्वयंसेवी संस्था संघटनांमार्फत मॅरेथॉन, प्रदर्शन, कार्यशाळा असे कार्यक्रम होत आहेत.

**<><><><>**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने पालघर जिल्ह्यातल्या मतदारांमध्ये जनजागृती करुन त्यांना मतदानासाठी प्रवृत्त करण्यासाठी, त्यांच्यातील राष्ट्रीय कर्तव्य भावना जागृत करण्यासाठी SVEEP मोहिम पालघर जिल्ह्यात राबवण्यात येत आहे. "No Voter to be left behind" "Nothing Like Voting, I Vote For Sure" या संकल्पनेवर आधारीत पालघर जिल्हाधिकारी कार्यालय आणि केंद्रीय संचार ब्यूरो, पुणे प्रादेशिक कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने SVEEP उपक्रमाअंतर्गत चित्ररथ संपूर्ण जिल्ह्यात फिरुन जनजागृती करणार आहे.

**<><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><>**

ज्येष्ठ सारंगीवादक पंडित रामनारायण यांच्या पार्थिवावर काल मुंबईत शासकीय इतमामाने अंत्यसंस्कार करण्यात आले. मुंबईत शुक्रवारी रात्री त्यांच वांद्रे इथल्या त्यांच्या राहत्या घरी वृद्धापकाळानं निधन झालं. ते ९७ वर्षांचे होते.

सारंगीला हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतात एकल वाद्य म्हणून नावारुपाला आणण्यात त्यांचा मोठा वाटा होता. वयाच्या १० व्या वर्षापासून सारंगीची तालीम घेणाऱ्या रामनारायण यांनी ऑल इंडिया रेडिओच्या लाहोर केंद्रावर सारंगीवादक म्हणून कारकिर्दीला प्रारंभ केला. शास्त्रीय संगीताबरोबरच चित्रपटसंगीतात अनेक गीतांमधे साथ करत त्यांनी आपला ठसा उमटवला. कहीं पे निगाहें कहीं पे निशाना, आंखो ही आँखोमे इशारा हो गया अशा वेगवेगळ्या गीतांमधे त्यांनी सारंगीवर वाजवलेली धून अविस्मरणीय ठरली. देशोदेशी त्यांनी सारंगीचे अनेक कार्यक्रम केले. तसंच अनेक दिग्गज कलाकारांना साथ संगत केली. २००५ मधे त्यांना पद्मविभूषण सन्मान प्रदान करण्यात आला होता. याखेरीज अनेक प्रतिष्ठेचे पुरस्कार त्यांना मिळाले होते. प्रख्यात सरोदवादक पंडित बृजनारायण यांचे ते वडील होते, तर प्रसिद्ध सारंगीवादक हर्ष नारायण यांचे आजोबा होते. पंडित रामनारायण यांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

**<><><><><>**

फुलंब्रीतल्या दरीफाटा इथे काल मध्यरात्री एका दुकानाला लागलेल्या आगीत तीन जणांचा होरपळून मृत्यू झाला तर दोन जण गंभीर जखमी झाले. हे दुकान प्लास्टिक साहित्य विक्रीचं असून ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याची माहिती आहे. आग लागल्याचं समजताच दुकान मालकानं दुकान उघडलं. त्यावेळी आगीमुळे दुकानात तयार झालेल्या गॅसचा स्फोट झाला आणि त्यात तीन जणांचा मृत्यू झाला. नितीन नागरे, गजानन वाघ आणि राजू पटेल अशी या तिघांची नावं आहेत. या दुर्घटनेतल्या गंभीर जखमी झालेल्या दोघांना छत्रपती संभाजीनगरच्या घाटी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

**<><><><><>**

भारत - दक्षिण आफ्रिका क्रिकेट टी-20 मालिकेतला दुसरा सामना आज संध्याकाळी गकेबरहा इथल्या सेंट जॉर्ज पार्क क्रिकेट मैदानावर होणार आहे.

भारतीय प्रमाणवेळेनुसार सामना रात्री साडेआठ वाजता सुरू होईल. मालिकेतील तिसरा सामना बुधवारी सेंच्युरियनमध्ये तर चौथा सामना शुक्रवारी जोहान्सबर्ग इथं होणार आहे. मालिकेतला पहिला सामना भारताने जिंकला आहे.

**<><><><><>**

भारताच्या पंकज अडवाणीनं IBSF विश्व बिलियर्ड्स अजिंक्यपद स्पर्धेत 150-अप फॉरमॅटचं विजेतेपद पटकावलं आहे. कतारमधे दोहा इथं झालेल्या अंतिम लढतीत त्यानं इंग्लंडच्या रॉबर्ट हॉलचा ४ विरुद्ध २ अशा गुणफरकाने पराभव केला. आयबीएफएसच्या जागतिक बिलियर्डस् स्पर्धेतलं पंकज अडवाणी याचं हे २८ वं विजेतेपद आहे. या स्पर्धेत भारताच्या सौरव कोठारी यानं कांस्यपदक मिळवलं.

**<><><><><>**

येत्या १२ नोव्हेंबरला होणाऱ्या कार्तिकी यात्रेच्या सोहळ्यानिमित्तानं पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई केली आहे. मंदिर समितीचं प्रवेशद्वार, मंदिराचं शिखर, सात मजली दर्शन मंडप या ठिकाणी रंगीबेरंगी आकर्षक विद्युत रोषणाई केली आहे. विद्युत रोषणाईमुळे मंदिर परिसर दिव्यांच्या प्रकाशानं उजळून निघाला आहे. आषाढी आणि कार्तिकी एकादशीचा दिवस वारकरी सांप्रदायासाठी प्रचंड आनंद आणि उत्साहाचा दिवस असतो. कार्तिकी एकादशीच्या वारीसाठी महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश, कर्नाटक अशा विविध राज्यांमधून शेकडोंच्या संख्येनं दिंड्या आणि पालख्या पंढरीत दाखल होत असतात.

**//<><><><><>//**